दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा सांगल

बुधवार, दि. १४ डिसेंबर २०२२
Website : janpravas.in

# पथनाट्य स्पर्धेत विवेकानंद कॉलेज प्रथम तर लघुनाटिका स्पर्धेत व्यंकटेश्वरा कॉलेज प्रथम

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**इचलकरंजी :** येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फाउंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या समारोपाच्या दिवशी आविष्कार - पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी मिळविले तर लघुनाटिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ सायन्स पेठनाका या संघाने मिळविले.



राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा समारोपादिवशी आविष्कार पथनाट्यस्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांसोबत मान्यवर व परिक्षक.

पथनाट्य स्पर्धेत सहभाग घेतलेल्या संघांनी अंधश्रद्धा, राष्ट्रीय एकात्मता, विषमता, भ्रष्टाचार, इत्यादी विषयांवर परखड भाष्य करणारी, प्रबोधनपर पथनाट्ये सादर केली. या स्पर्धेत डी. आर. के. कॉलेज कोल्हापूर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला तर दि न्यू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. यामध्ये आनंदी बी फार्मसी कॉलेज कळंबा यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला.

लघुनाटिका स्पर्धेतील संघानी सद्यस्थिती, जातीय व धार्मिक भेदभाव, वेश्या आणि तृतीय पंथीयांच्या समस्या इत्यादी विषय प्रबोधन, उपहास, विडंबन अशा विविध शैलीमधून मांडले. या स्पर्धेतील द्वितीय क्रमांक परीसस्पर्श कराड यांनी प्राप्त केला. तृतीय क्रमांक डी. आर. के. कॉलेज कोल्हापूर यांनी मिळविला तर आ. रा. पाटील कन्या महविद्यालय इचलकरंजी या संघांस उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आला.

सदरच्या दोन्ही स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून रंगकर्मी यशोधन गडकरी सांगली, संजय सातपुते इचलकरंजी आणि प्रा. पी. डी. गावडे चंदगड यांनी जबाबदारी पार पाडली. सुरुवातीला स्पर्धा समन्वयक संतोष आबाळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते परीक्षकांना गुलाब पुष्प प्रदान करण्यात आले.

मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष समीर गोवंडे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. स्पर्धा समारोपप्रसंगी सर्व परीक्षक त्याचबरोबर जेष्ठ रंगकर्मी प्रा. मिलिंद दांडेकर, संजय होगाडे, अशोक बोरगांवकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी सर्व परीक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त असे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर नाट्यकला ही एक जिवंत आणि उर्जादायी कला असून तरुणाईने नाटक करीतं राहण्याची गरज आहे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पथनाट्य स्पर्धेचे सूत्रसंचालन त्रिंबक दातार व राजू सोलगे यांनी केले तर लघुनाटिका स्पर्धेचे सूत्रसंचालन अक्षय कांबळे आणि खुशी भांगडिया यांनी केले. या सर्व स्पर्धांना रसिक प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. सदरच्या स्पर्धा येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृह आणि परिसरात संपन्न झाल्या. या स्पर्धेत इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड, इस्लामपूर या भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.

लोकमत
कोल्हापूर, बुधवार, दि. १९ ऑक्टोबर २०२२ ११

# मध्यवर्ती युवा महोत्सवात कोल्हापूरचा डंका

## तरुणाईचा जल्लोष : लोककला, शास्त्रीय नृत्य, नाटक, संगीत विभागात 'विवेकानंद'ची बाजी

लक्ष्मण सरगर
लोकमत न्यूज नेटवर्क

आटपाडी : तरुणाईच्या जल्लोषात भर घालणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालय, आजरा महाविद्यालयाने वर्चस्व सिद्ध केले. सरदार बाबासाहेब माने लोककला व लोकनृत्य फिरता चषक, विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव फिरता चषक पटकावला. विवेकानंदच्या संघाने वैयक्तिक व सांघिक दोन्ही प्रकारात प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार जनरल चॅम्पियनशिप पटकावली.



आटपाडी येथे मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या ४२व्या मध्यवर्ती युवक महोत्सवाच्या समारोपप्रसंगी कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्यासमोर विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला. यावेळी आटपाडी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, डॉ. सुभाष करांडे, एच. यू. पवार, डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य विजय लोंढे, डॉ. दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल (अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय) वैयक्तिक स्पर्धा प्रकार : शास्त्रीय नृत्य : रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), आनंदराव नाईक (चिखली), शिंदे कॉलेज (कोल्हापूर). नकला : वाय. सी. इन्स्टिट्यूट (सातारा), राजाराम (कोल्हापूर), मुधोजी (फलटण)

एकपात्री अभिनय : सावित्रीबाई फुले महिला (सातारा), व्यंकटेश्वरा (पेठनाका), गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर) (विभागून), सुगम गायन : आर्ट्स, कॉमर्स, सायन्स (कऱ्हाड), विलिंग्डन (सांगली), न्यू कॉलेज (कोल्हापूर) शास्त्रीय गायन : शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर)

पाश्चिमात्य एकल गायन : देशभक्त रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर), डी. वाय. पाटील (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण (सातारा) (विभागून), शास्त्रीय सूरवाद्य : आनंदराव नाईक (चिखली), देशभक्त रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर), शास्त्रीय तालवाद्य : यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर) आनंदराव नाईक (चिखली), अण्णासाहेब डांगे (आष्टा), पश्चिमात्य एकल वादन : बापूजी साळुंखे (मिरज), विवेकानंद (कोल्हापूर), गवर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड).

स्थळचित्रण : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शिवराज (गडहिंग्लज), सद्गुरू (कराड), व्यंगचित्र : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शिवाजी विद्यापीठ, मुधोजी (फलटण), विवेकानंद (कोल्हापूर) (विभागून). भित्तीचित्र : सावित्री फुले महिला (सातारा), मुधोजी (फलटण), आनंदराव नाईक (चिखली). कातरकाम : शिवराज (गडहिंग्लज), सद्गुरू (कराड), न्यू कॉलेज (कोल्हापूर). स्थळ छायाचित्रण : विवेकानंद (कोल्हापूर), मुधोजी (फलटण), आजरा (आजरा). माती काम : राजाराम (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), वेणूताई चव्हाण (कऱ्हाड), डी. पी. भोसले (कोरेगाव) (विभागून). रांगोळी : यशवंतराव (हलकर्णी), कलाप्रबोधनी (कोल्हापूर), शिवराज (गडहिंग्लज). मेहंदी : चव्हाण (सातारा), नाना पाटील (वाळवा), डी. वाय. पाटील (कोल्हापूर). वक्तृत्व (मराठी) : भोगावती (कुरूकली), गरवारे (सांगली), छत्रपती शिवाजी (सातारा). वक्तृत्व (हिंदी) : डी. पी. भोसले (कोरेगाव), न्यू कॉलेज (कोल्हापूर), आरवडे (सांगली). वक्तृत्व (इंग्रजी) : विवेकानंद (कोल्हापूर), गव्हर्न्मेंट कॉलेज (कराड), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर). लोकनृत्य : आजरा महाविद्यालय (आजरा), यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर), यशवंतराव चव्हाण (सातारा), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी) (विभागून). लोककला : सावित्रीबाई फुले महिला (सातारा), विवेकानंद (कोल्हापूर) (विभागून), आक्काताई पाटील (इचलकरंजी), दहिवडी (दहिवडी) (विभागून), आनंदराव नाईक (चिखली), श्री वेंकटेश (इचलकरंजी) (विभागून). एकांकिका : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), बयाबाई कदम (कडेगाव), आर्ट्स अँड कॉमर्स (नागठाणे).

सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनय एकांकिका : विवेकानंद (कोल्हापूर), छत्रपती शिवाजी (सातारा), सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका : आर्ट्स अँड कॉमर्स (नागठाणे), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शंकरराव जगताप (वाघोली), बयाबाई कदम (कडेगाव) (विभागून)

लघुनाटिका : श्री शिवशाहू (सरूड), मुधोजी (फलटण), धनंजयराव गाडगीळ (सातारा), भारती इंजिनिअरिंग (कोल्हापूर), मूकनाट्य : दहिवडी कॉलेज (दहिवडी), विवेकानंद (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर). पथनाट्य : राजमती (सांगली), विवेकानंद (कोल्हापूर), दूधसाखर (बेंद्रे). भारतीय समूह गीत : विवेकानंद (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी). पाश्चिमात्य समूहगीत : विवेकानंद (कोल्हापूर), मुधोजी (फलटण), यशवंतराव चव्हाण (सातारा). लोकवाद्य वृंद : मुधोजी (फलटण), विवेकानंद (कोल्हापूर), आनंदराव नाईक (चिखली), यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर) (विभागून)

सांघिक रचना कृती : कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (कोल्हापूर), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), वाद विवाद : गव्हर्न्मेंट कॉलेज (कऱ्हाड), विलिंग्डन (सांगली), केआयटी कॉलेज (कोल्हापूर). प्रश्नमंजूषा : यशवंतराव चव्हाण (सातारा), तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग (वारणानगर) , डी. पी. भोसले (कोरेगाव).

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक : सावित्रीबाई फुले (सातारा) व विवेकानंद (कोल्हापूर) सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक : आजरा महाविद्यालय (आजरा) विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव फिरता गौरव चषक : नृत्य विभाग : लोकनृत्य : आजरा महाविद्यालय (आजरा), लोककला : सावित्रीबाई फुले (सातारा), शास्त्रीय नृत्य : विवेकानंद (कोल्हापूर)

नाट्य विभाग : विवेकानंद (कोल्हापूर), संगीत विभाग : विवेकानंद (कोल्हापूर). कला विभाग : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी). वाड्मय विभाग : गव्हमेंट इंजिनिअरींग (कऱ्हाड).

दै० लोकमत
दि. 17.11.2022



# स्पॉट फोटोग्राफीत मंगेशला सुवर्णपदक

कोल्हापूर : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे झालेल्या १८ व्या महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ युवा महोत्सवात "इंद्रधनुष्य"मध्ये मंगेश मोरे याला स्पाटॅ फोटोग्राफीत सुवर्णपदक मिळाले आहे. मंगेशने शिवाजी विद्यापीठाच्या संघातून महोत्सवात सहभाग घेतला होता. तो विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे.

लोकमत
शनिवार १२.३.२०२२

# 'पुरुषोत्तम करंडक'चा पडदा उघडला

## उद्घाटनादिवशी तीन संघांची सलामी : उद्या होणार बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनामुळे तब्बल दोन वर्षाच्या खंडानंतर शुक्रवारी शिवाजी विद्यापीठातील भाषा भवनात पुरुषोत्तम करंडक या प्रसिद्ध आंतर महाविद्यालयीन करंडक स्पर्धेचा पडदा कोल्हापुरात थाटात उघडला आणि नाट्यप्रेमी विद्यार्थ्यांनी एकच जल्लोष केला. उद्घाटनाच्या दिवशीच विवेकानंद, राजाराम आणि कॉमर्स कॉलेजने सलामी देत दमदार एकांकी सादर करत प्रेक्षकांसह परीक्षकांची मने जिंकली. तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचे बक्षीस वितरण उद्या रविवारी दुपारी होणार आहे.

कलोपासक, देवल क्लब व शिवाजी विद्यापीठ संगीत शास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भरवण्यात आलेल्या या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन शुक्रवारी दुपारी वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये गायन समाज देवल क्लबचे अध्यक्ष व्ही. बी. पाटील यांच्या हस्ते झाले. यानंतर विवेकानंद महाविद्यालय, , कॉमर्स व राजाराम महाविद्यालय यांनी एकांकिकांचे सादरीकरण केले. आज शनिवारी ८ आणि रविवारी ४ महाविद्यालयाची एकांकिका सादर होणार आहेत. उद्घाटन सत्राला देवल क्लब नाट्यशाखा प्रमुख उमा नामजोशी, अनुपम दाभाडे, शिवाजी विद्यापीठ संगीत विभाग शास्त्रच्या अंजली निगवेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

### एकूण चार बक्षिसे

एकांकिका स्पर्धेतील विजेत्यांना पुरुषोत्तम करंडक चषक तर उत्कृष्ट प्रायोगिक एकांकिकेसाठी उमा दिगंबर करंडक अशी एकूण चार बक्षिसे दिली जणार आहेत. रविवारी ४ वाजता सिने नाट्य अभिनेते सतीश सलागरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे.

### १५ संघांचा सहभाग

दोन वर्षाच्या खंडानंतर होत असलेल्या या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत कोल्हापूरसह इचलकरंजी, सांगली, सातारा, इस्लामपूर येथील १५ महाविद्यालयीन संघांनी सहभाग घेतला आहे.

लोकमत कोल्हापूर
दि. 06.04.2022

# कोरोनाने निर्माण झालेली कमतरता मेहनतीने भरून काढा

## भगतसिंह कोश्यारी : ऐश्वर्या मोरे, स्वाती पाटील, मयूरेश शिखरे याचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांत शिक्षणात खंड पडल्याने काही कमतरता निर्माण झाल्या आहेत. त्या भरून काढण्यासाठी आता कोरोनाचा काळ विसरून विद्यार्थी, शिक्षकांनी दुप्पट मेहनत करावी. कोणत्याही क्षेत्रात राहा; पण, मेहनत करून स्वत:सह विद्यापीठ, देशाचा नावलौकिक वाढविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहन राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या दीक्षान्त समारंभात घोषित करण्यात आलेल्या विविध पदकांच्या वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमात राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील ऐश्वर्या मोरे (रा. वडरगे, जि. कोल्हापूर) हिला क्रीडा, बौद्धिक व कला क्षेत्र आणि एनसीसी, एनएसएस यामधील गुणवत्तेबद्दल राष्ट्रपतिपदक, सांगलीतील कस्तुरीबाई वालचंद महाविद्यालयातील स्वाती पाटील (दानोळी, ता. शिरोळ) यांना एम.ए. (हिंदी) परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपतिपदक, तर विवेकानंद महाविद्यालयाच्या मयूरेश शिखरे (कोल्हापूर) याला कला, साहित्य, सांस्कृतिक प्रावीण्याबद्दल शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी केवळ दिसण्यापेक्षा अनेकविध चांगल्या गोष्टी करण्यावर अधिक भर द्यावा. देश आणि मातृभाषा यांच्याप्रति आदरभाव सदैव बाळगून कार्यरत रहावे. सर्व भाषा शिकाव्यात त्यांचा आदर करावा. त्यात मातृभाषेचे स्थान उच्च राहावे, असे राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले. या कार्यक्रमास परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, वित्त व लेखाधिकारी ए. बी. पाटील आदींसह पदके, पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांनी स्वागत केले. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचा आढावा मांडला. नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते ऐश्वर्या मोरे हिला राष्ट्रपतिपदक, स्वाती पाटील यांना कुलपतिपदक, तर मयूरेश शिखरे याला शहीद तुकाराम ओंबाळे विशेष पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

### छ. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वामुळे आपले अस्तित्व

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र प्रेरणादायी आहे. महाराजांच्या कार्यकर्तृत्वामुळेच आजचे आपले अस्तित्व आहे. त्याचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करावे. त्यांच्या प्रेरणेतून स्वतःची उन्नती साधावी, असे आवाहन राज्यपाल कोश्यारी यांनी केले.

# विवेकानंद, न्यू कॉलेज, 'डी. वाय. पाटील'ची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ७६ महाविद्यालयांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय ४२ व्या युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सहा कलाप्रकारात प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली. शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज व डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने प्रत्येकी तीन कला प्रकारात यश मिळविले. जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १,३०० कलाकारांनी भाग घेतला होता.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा : लोककला- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लोकनृत्य- आजरा महाविद्यालय, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी.

मूकनाट्य- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. नकला- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी.वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर.

वक्तृत्व मराठी- भोगावती महाविद्यालय कुरकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. हिंदी- विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. इंग्रजी- विवेकानंद कॉलेज, के.आय.टी. कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.

समूहगीत- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, पथनाट्य- आनंदी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. प्रश्नमंजूषा- तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज वारणानगर, डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.



गडहिंग्लज येथील डॉ.घाळी महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील लोकनृत्य प्रकारातील एक क्षण.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

१६ ते १८ ऑक्टोबरअखेर मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाडी येथील बाबासाहेब देसाई महाविद्यालयात होणार आहे.

दैनिक महासत्ता

गुरुवार, ता.१५ डिसेंबर २०२२

# पथनाट्य, लघुनाटिका स्पर्धेत विवेकानंद, व्यंकटेश्वरा कॉलेज प्रथम

इचलकरंजी,ता.१४-

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फाऊंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय युवा स्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या समारोपाच्या दिवशी आविष्कार-पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी तर लघुनाटिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व्यंकटेश्वरा कॉलेज ऑफ सायन्स पेठनाका या संघाने मिळविले

पथनाट्य स्पर्धेत सहभाग घेतलेल्या संघांनी अंधश्रद्धा, राष्ट्रीय एकात्मता, विषमता, भ्रष्टाचार इत्यादी विषयांवर परखड भाष्य करणारी, प्रबोधनपर पथनाट्ये सादर केली. या स्पर्धेत डी.आर.कॉलेज कोल्हापूर यांनी द्वितीय क्रमांक मिळविला तर दि न्यू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज इचलकरंजी यांनी तृतीय क्रमांक मिळविला. यामध्ये आनंदी बी फार्मसी कॉलेज कळंबा यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला.



पथनाट्य स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविणारा दि न्यू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा संघ.

परीक्षक म्हणून रंगकर्मी यशोधन गडकरी (सांगली), संजय सातपुते (इचलकरंजी) आणि प्रा.पी.डी.गावडे यांनी जबाबदारी पार पाडली. संतोष आबाळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते परिक्षकांना गुलाबपुष्प प्रदान करण्यात आले. मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष समीर गोवंडे यांनी मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ रंगकर्मी प्रा.मिलिंद दांडेकर, संजय होगाडे, अशोक बोरगावकर यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

सूत्रसंचालन त्रिंबक दातार, राजू सोलगे, अक्षय कांबळे, आणि खुशी भांगडिया यांनी केले. या स्पर्धेला रसिक प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

दैनिक
महासत्ता

सोमवार,
ता. २८ मार्च २०२२

# राज्यस्तरीय पथनाट्य स्पर्धेत विवेकानंद कॉलेज प्रथम

**इचलकरंजी, ता.२७**

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल यांच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या पहिल्या दिवशी अविष्कार– पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी मिळविले तर लघुनाटिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक परिसस्पर्श कराड या संघाने मिळविले.



या पथनाट्य स्पर्धेत अश्वघोष फौंडेशन कोल्हापूर यांनी द्वितीय क्रमांक मिळविला तर नाटक वर्ल्ड कोल्हापूर यांनी तृतीय क्रमांक मिळविला. लघुनाटिका द्वितीय क्रमांक एसीएस कॉलेज मिरज यांनी तर तृतीय क्रमांक नाट्य वर्ल्ड कोल्हापूर यांनी मिळविला. आम्ही रंगकर्मी मुंबई आणि गडहिंग्लज कला अकादमी या संघांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले.

सदरच्या दोन्ही स्पर्धासाठी परीक्षक म्हणून डॉ. राजश्री खटावकर कोल्हापूर, प्रशांत गोखले मिरज आणि शुभम चौगुले जयसिंगपूर यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. मिलींद दांडेकर आणि सर्व परीक्षक यांच्या हस्ते नटराज प्रतिमा पुजन आणि दिप प्रज्वलन करण्यात आले.

स्पर्धा समारोपप्रसंगी प्रा.दांडेकर आणि सर्व परिक्षक त्याचबरोबर प्रा. डॉ. प्रशांत कांबळे, दत्ता टोणपे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. संतोष आबाळे यांनी स्वागत केले. पथनाट्य स्पर्धेचे सुचसंचालन त्रिंबक दातार व रोहीत कुरणे यांनी केले तर लघुनाटिका स्पर्धेचे सूत्रसंचालन मानसी कुलकर्णी, सारंग भांबुरे व निखिल शिंदे यांनी केले.

II पुढारी संमिश्र कोल्हापूर, बुधवार, १९ ऑक्टोबर २०२२

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजला सांघिक विजेतपद

**आटपाडी :** शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रथम कुलगुरू स्वर्गीय डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक आणि अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप फिरता चषक उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने पटकावला. विविध कला प्रकारातील महाविद्यालयांना आणि विद्यार्थांना कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के, अमरसिंह देशमुख, डॉ. आर. व्ही. गुरव व मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.

दै. पुढारी : दि. 06.04.2022

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मरण प्रेरणेतून विद्यार्थ्यांनी उन्नती साधावी

## ाज्यपाल भगतसिंह कोश्यारी; विद्यापीठात राष्ट्रपती, कुलपती सुवर्णपदक प्रदान सोहळा

**ोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे रित्र प्रेरणादायी आहे. महाराजांच्या ार्यकर्तृत्वामुळे आपले अस्तित्व आहे, ाचे भान राखून विद्यार्थ्यांनी त्यांचे स्मरण करावे. त्यांच्या प्रेरणेतून स्वतःची उन्नती साधावी, असे आवाहन राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ ५८व्या दीक्षान्त समारंभातील राष्ट्रपतींचे सुवर्णपदक ऐश्वर्या मोरेला तर कुलपतींचे सुवर्णपदक स्वाती पाटील, तुकाराम ओंबाळे पारितोषिक मयुरेश शिखरे यास प्रदान करताना कुलपती भगतसिंह कोश्यारी. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील. (छाया : नाज ट्रेनर)**

शिवाजी विद्यापीठाच्या ५८व्या दीक्षान्त समारंभात घोषित शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात द्वितीय वर्षातील ऐश्वर्या मोरेला शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रपती सुवर्णपदक कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगलीच्या स्वाती पाटीलला कुलपती सुवर्णपदक कुलपती कोश्यारी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील केंट क्लब निर्मित शहीद तुकाराम ओंबाळे विशेष कला, साहित्य, सांस्कृतिक प्राविण्य पारितोषिक विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी मयुरेश शिखरे यास कुलपतींच्याहस्ते देण्यात आले.

कोश्यारी म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या नगरीत छत्रपती शिवाजीमहाराजयांच्यानावानेअसलेल्या शिवाजी विद्यापीठाचा हिरकमहोत्सव, स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव असा योग जुळून आला आहे. विद्यापीठाने कोरोना काळात विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांनी सर्व भाषा शिकण्याबरोबरच सर्व भाषांचा आदर केला पाहिजे. त्यात मातृभाषेचे स्थान उच्च असावे. शिक्षकांनी विविध भाषांचा अवलंब करून मातृभाषेतून कसे शिकविता येतील, याद्दष्टीने प्रयत्न करावा, असे आवाहन त्यांनी केले.

### महाराष्ट्र संतांचा प्रदेश

महाराष्ट्र संतांचा प्रदेश आहे. त्यांनी दिलेली नैतिक मूल्ये जीवनात आचरण करावीत. यासाठी विद्यार्थ्यांनी रामायण, महाभारत याचबरोबर ज्ञानेश्वरी वाचावी. त्यांच्या स्मरणातूनच ताकद, प्रेरणा मिळेल. 'अच्छा करोगे, तो चार चाँद लगेंगे' असे म्हणत कुलपती कोश्यारी यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

### विद्यार्थिनीची आशियाई स्पर्धेसाठी निवड ही अभिमानाची बाब

क्रीडा क्षेत्रात शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी सबिना मुलाणी ब्राझीलमध्ये होणाऱ्या कर्णबधिरांसाठीच्या ऑलिंपिकसाठी पात्र ठरली आहे. स्वाती शिंदे विद्यार्थिनीची मंगोलियात होणाऱ्या आशियाई स्पर्धांसाठी निवड झाली आहे. ही अभिमानाची बाब असल्याचे कुलगुरु डॉ.शिर्के म्हणाले.

कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. ते म्हणाले, कोरोनाच्या सावटातून प्रदीर्घ कालावधीनंतर विद्यार्थ्यांचे विद्यापीठ आवारात आगमन झाले, ही समाधानाची बाब आहे. विद्यापीठ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०च्या अंमलबजावणीसाठी तयार आहे. एकात्मिक अभ्यासक्रम, कौशल्य विकासशिक्षणवप्रशिक्षण, मूल्यशिक्षण, मूल्यवर्धित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सक्षम विद्यार्थी घडविण्यास विद्यापीठ तत्पर आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील, सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

# विवेकानंद, न्यू कॉलेज, 'डी. वाय. पाटील'ची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ७६ महाविद्यालयांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडहिंग्लज :** शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय ४२ व्या युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सहा कलाप्रकारात प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली. शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज व डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने प्रत्येकी तीन कला प्रकारात यश मिळविले. जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १,३०० कलाकारांनी भाग घेतला होता.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा : लोककला- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लोकनृत्य- आजरा महाविद्यालय, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी.

मूकनाट्य- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. नकला- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी.वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर.

वक्तृत्व मराठी- भोगावती महाविद्यालय कुरकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. हिंदी- विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. इंग्रजी- विवेकानंद कॉलेज, के.आय.टी. कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.



गडहिंग्लज येथील डॉ.घाळी महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील लोकनृत्य प्रकारातील एक क्षण.

समूहगीत- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर, पथनाट्य- आनंदी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. प्रश्नमंजूषा- तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज वारणानगर, डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

१६ ते १८ ऑक्टोबरअखेर मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाडी येथील बाबासाहेब देसाई महाविद्यालयात होणार आहे.

दै० सकाळ, दि० 25.10.2022

# यिन कला महोत्सवाची उत्कंठा शिगेला

## तरुणाईकडून जोरदार तयारी; महाविद्यालयांतून वाढता प्रतिसाद

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

RUTURAJ SANJAY PATIL FOUNDATION
PRESENTS

YIN कला महोत्सव
कोल्हापूर

कोल्हापूर, ता. २४ : सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) होत असलेल्या यिन कला महोत्सवाची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. तरुणाई कला महोत्सवात त्यांच्यातील कलागुण सादर करण्यासाठी जोरदार तयारीला लागली असून, कला महोत्सवास महाविद्यालयीन वर्तुळातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला आहे. ऋतुराज पाटील फाउंडेशन प्रस्तुत हा कला महोत्सव आहे.

यिन कला महोत्सवाच्या अधिक माहितीसाठी यिन सहायक व्यवस्थापक अवधूत गायकवाड (९९७५१३१२७०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.



यिन तरुणाईला सशक्त करणारे व्यासपीठ आहे. नेतृत्व घडविणारे माध्यम म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. कला गुणांना वाव देण्यासाठी यिनतर्फे होणारा कला महोत्सव महत्त्वपूर्ण आहे. त्यात तरुणाई उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सुप्त गुणांचे सादरीकरण उत्तम प्रकारे करेल, असा विश्वास आहे.

- डॉ. अनिलकुमार गुप्ता (कार्यकारी संचालक, डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप)



यिन कला महोत्सव हा नावीन्यपूर्ण उपक्रम आहे. सकाळ माध्यम समूहाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी यिन हक्काचे व्यासपीठ दिले आहे. कला महोत्सवासाठी विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. महोत्सवात ते सहभाग घेऊन उत्कृष्टरीत्या कला गुणांचे सादरीकरण करतील, यात शंका नाही.

- डॉ. राजकुमार एस. बगली (प्राचार्य, सरोजिनी कॉलेज ऑफ फार्मसी)



यिन कला महोत्सव तरुणाईसाठी मनोरंजनाची पर्वणी आहे. विद्यार्थ्यांमधील कलाकार शोधून त्यांना प्रेरणा देण्याचा विधायक यिन राबवत आहे. यिन म्हणजे ऊर्जा व विद्यार्थ्यांवर केले जाणारे सुसंस्कार. या उपक्रमात विद्यार्थ्यांमधील सुसंवाद वाढून निकोप स्पर्धा पाहण्यास मिळेल, अशी अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांना कौशल्य सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे.

- डॉ. व्ही. ए. पाटील (प्राचार्य, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स)



विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे मुक्त व्यासपीठ म्हणजे यिनचा कला महोत्सव होय. यात कोल्हापूरसह अन्य जिल्ह्यांतील विद्यार्थी एकत्र येणार आहेत. त्यांच्यात सांस्कृतिक विचारांचा देवाण-घेवाण होणार आहे. जी कलेच्या प्रांतात महत्त्वाची आहे.

- डॉ. व्ही. एस. ढेकळे (प्राचार्य, सायबर महिला महाविद्यालय)



कल्चरल ॲक्टिव्हिटी करण्यासाठी आम्ही नेहमीच विद्यार्थ्यांना पाठबळ देत असतो. असे उपक्रम सांस्कृतिक कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांचा संपूर्ण विकास हा त्यामागचा हेतू असतो. ज्यामध्ये इंजिनिअरिंगसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमात उपयोगी असणाऱ्या अनेक कौशल्यांचा विकास होतो.

- डॉ. विजय घोरपडे (प्राचार्य, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग)



यिन कला महोत्सव कॉलेज यूथसाठी आनंदमेळा आहे. या टप्प्यावर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना असे व्यासपीठ मिळणे आवश्यक असते. यिन उपक्रमाच्या माध्यमातून तरुणाई स्वत:ला घडवत आहे. सामाजिक बांधिलकीबरोबर कला, सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल, हे नक्की.

- डॉ. महादेव नरके (प्राचार्य, डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निक)



महाविद्यालयीन तरुणाईला समाजातील घडामोडींबाबत सजग करणारे यिन महत्त्वाचे व्यासपीठ आहे. सामाजिक उपक्रमांत यिनच्या माध्यमातून तरुणाई समाजात परिवर्तन घडविण्यासाठी पुढाकार घेत आहे. आता कला महोत्सवात हीच तरुणाई सहभागी होऊन विविध कलाविष्कार सादर करेल. यातून सर्वच तरुणांना एक नवी ऊर्जा मिळेल.

- डॉ. आर. आर. कुंभार (प्राचार्य, विवेकानंद महाविद्यालय)

सकाळ

शनिवार,
३ सप्टेंबर २०२२

# ठेच हीच भविष्यातील झेप असते

## अवधूत गुप्ते; 'सकाळ माध्यम समूहा'च्या 'यिन'तर्फे 'यिन संवाद' उपक्रम

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

सकाळ वृत्तसेवा




कोल्हापूर : 'सकाळ माध्यम समूहा'च्या 'यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क'तर्फे (यिन) विवेकानंद महाविद्यालयात आयोजित 'यिन संवाद' उपक्रमात बोलताना निर्माता व गायक अवधूत गुप्ते. समोर उपस्थित विद्यार्थी.

कोल्हापूर, ता. २ : आयुष्यात लागलेली ठेच हीच भविष्यातील झेप असते. हार न मानता चालत राहा आणि भरपूर ज्ञान कमवा, स्वतःची स्वप्ने साकार करताना चांगला नागरिक बना, असे आवाहन निर्माता व गायक अवधूत गुप्ते यांनी आज येथे केले.

'सकाळ माध्यम समूहा'च्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कतर्फे (यिन) महावीर महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, सायबर कॉलेज व सायबर महिला महाविद्यालयातर्फे आयोजित 'यिन संवाद' उपक्रमात ते बोलत होते. दिग्दर्शक विशाल देवरुखकर, अभिनेता पार्थ भालेराव, अभिनेत्री विदुला चौगुले, अभिनेता प्रतीक लाड व सुमंत शिंदे उपस्थित होते.

गुप्ते म्हणाले, की 'यिन'चे संस्कार विसरू नका. देशाचा चांगला नागरिक बनण्याची जबाबदारी तुमची आहे. तुमच्यातील नेतृत्व गुण वाढीस लागण्यासाठी 'यिन' वैविध्यपूर्ण उपक्रमांतून तुम्हाला घडवत आहे. चांगला नागरिक बनून देशसेवेसाठी तत्पर राहा. महाविद्यालयीन काळात पाहिलेली स्वप्ने साकार करण्यासाठी जिद्द सोडू नका. आयुष्यात कधी ठेच लागली तर नाउमेद न होता पुन्हा आव्हानाला प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज व्हा. ते म्हणाले, की कोल्हापूरच्या मातीत रांगडेपणा आहे. इथले लोक एकमेकांना मदत करणारे आहेत. 'जगात भारी कोल्हापुरी' त्यामुळेच म्हटले जाते. माझे शिक्षण मुंबईत झाले असले तरी कोल्हापूरच्या मातीची माझी ओढ वेगळीच आहे. शिवाजी पेठेत तर मी काही काळ वास्तव्यालाच होतो. लाल मातीची रग माझ्याही अंगात आहे.

त्यांनी काही मराठी गीते सादर करीत विद्यार्थ्यांना डोलवले. त्याला टाळ्या, शिट्यांचा जोरदार प्रतिसाद मिळाला. प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संचालक डॉ. एस. पी. रथ, प्राचार्य डॉ. एस. व्ही. ढेकळे, डॉ. शरद गायकवाड, लेफ्टनंट उमेश वांगदरे, डॉ. अरिफ महात, डॉ. प्रभा पाटील, डॉ. दीपक भोसले, प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराक्टे, प्रा. श्वेता पाटील, प्रा. ज्योती हिरेमठ, प्रा. अमर मेस्त्री, प्रा. निकिता जरग, प्रा. तेजस्विनी चिले, प्रा. श्यामल पवार, प्रा. सायली चव्हाण, प्रा. संदीप पाटील उपस्थित होते. 'यिन' मुख्यमंत्री पार्थ देसाई, रोहन शारबिद्रे, सौरभ चौगले, ओंकार साठे, ओंकार चव्हाण, ज्योती कपले, ऋषीकेश कारंजे, अजिंक्य शिंदे, पृथ्वीराज घोडके, आदिती कोरे, प्रथमेश कोळी, प्रणाली सावंत, श्रुतिका लाळे, प्रशांत गवसेकर, सुयश पाटील, विशाखा देवलकर, श्रेया चौगुले, राजलक्ष्मी कदम, शिवानी शिंदे, निखिल जाधव, चित्रेशा नांगरे, हरीश सांधुगडे, हर्षद पवार, अनिकेत सूर्यवंशी, रोहित कांबळे यांनी परिश्रम घेतले. 'यिन'चे सहायक व्यवस्थापक अवधूत गायकवाड यांनी संयोजन केले.

P
03/09/22
P
3/9/22

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १२ ऑक्टोबर २०२२ ५

# विवेकानंद कॉलेजची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव; दत्ताजीराव कदम व न्यू कॉलेजचे विद्यार्थीही चमकले

गडहिंग्लज, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाचा ४२ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात झाला. येथील डॉ. घाळी महाविद्यालयाने महोत्सवाचे संयोजन केले होते. १५ कलाप्रकारांत ७६ महाविद्यालयांतील १२६५ स्पर्धक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपली कला सादर केली. यात विवेकानंद कॉलेजच्या (कोल्हापूर) विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करीत बाजी मारली. त्याखालोखाल दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी) व न्यू कॉलेजचे (कोल्हापूर) विद्यार्थी चमकले. विशेष म्हणजे पावसातही विद्यार्थ्यांच्या उत्साहाला भरते आले होते.




गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवात कला सादर करताना स्पर्धक विद्यार्थी.

कलाप्रकारनिहाय अनुक्रमे विजेते असे- (लोककला)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. (लोकनृत्य)- आजरा महाविद्यालय आजरा, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी. (मूकनाट्य)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. (नकला)- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. (मराठी वक्तृत्व)- भोगावती महाविद्यालय कुरुकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. (हिंदी वक्तृत्व)- विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. (इंग्रजी वक्तृत्व)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

(वादविवाद)- डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर. (सुगम गायन)- न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (लोकसंगीत वाद्यवृंद)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (लघुनाटिका)- शिव-शाहू महाविद्यालय सरुड, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. (एकांकिका)- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (समूह गीत)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर. (पथनाट्य)- आनंदी बी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (प्रश्नमंजूषा)- तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग वारणानगर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव १६ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय संयोजक आहे. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रथम तीन विजेते महाविद्यालये मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रतिनिधित्व करतील.

मंगळवार, १२ एप्रिल २०२२ त. भारत

# अभिनेत्री श्रुतकिर्तीने साधला विवेकानंदच्या विद्यार्थ्यांशी संवाद



**कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत अभिनेत्री श्रुतकिर्ती सावंत.**

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजची माजी विद्यार्थी आणि विद्यार्थी विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विवेकानंदमध्ये श्रुतकिर्ती सावंत यांची विद्यार्थ्यांनी मुलाखत घेतली. यामध्ये तेजस गुरव, नियती धर्माधिकारी, प्रचिती चिंचणकर, श्रावणी पाटील, मिलिशा जाधव, सोयम सावंत यांनी हसत, खेळत मुलाखत पार पडली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.सावंत ही विवेकानंद कॉलेजची माजी विद्यार्थिनी असून ती सध्या तुझ्या रुपाचं चांदण या मालिकेत अभिनय करीत आहे. श्रुतकिर्ती सावंत म्हणाली, माझ्या अभिनय कारकीर्दीची सुरुवात विवेकानंद कॉलेजमधून झाली. आपल्या कामावर निष्ठा ठेवून काम केल्यास निश्चित यश मिळते. भरपूर कष्ट करा व जिद्दीने यश मिळवा. अभिनय क्षेत्रातही अनेक कामाच्या संधी आहेत त्याचा कलाकार विद्यार्थ्यांनी फायदा घेतला पाहिजे. वार्षिक स्नेहसंमेलन, पुरुषोत्तम करंडक स्पर्धा, विद्यापीठ युवा महोत्सवामध्ये आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे. महाविद्यालयास अनेक पारितोषिके मिळवून दिली आहेत. डॉ. कविता तिवडे , डॉ केदार उंडाळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. डॉ. कविता तिवडे यांनी श्रुतकिर्तीचा महाविद्यालयातर्फे सत्कार केला. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

तरुण भारत
गुरुवार, २० ऑक्टोबर २०२२

# युवा महोत्सवात कोल्हापूरच्या महाविद्यालयांचे वर्चस्व

## आटपाडीत तीन जिल्ह्याचा मध्यवर्ती महोत्सवाचे यशस्वी आयोजन : इचलकरंजी, गडहिंग्लज, आजरासह करवीरच्या कॉलेजची मोठी बाजी

प्रतिनिधी
आटपाडी

शिवाजी विद्यापीठाचा तीन जिल्ह्याचा मध्यवर्ती युवा महोत्सव यशस्वी करत आटपाडीतील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाने शिवधनुष्य यशस्वी पेलले आहे. या महोत्सवात विविध स्पर्धांतून कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी वर्चस्व गाजवले.

दरम्यान, पारितोषिक समारंभावेळी युवा महोत्सव म्हणजे फक्त कलागुणांना वाव नसून तो संस्कृती जतन करण्याचा भाग असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाने संयोजनाची ही संधी दिल्याने कृतार्थ असल्याची भावना आटपाडी एज्युकेशनचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी व्यक्त केली. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी युवा महोत्सवातुन विद्यार्थ्यांचे भवितव्य घडत आहे. प्राचार्य डॉ. विजय लोंढे यांनी महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वच घटकांनी योगदान दिल्याचे सांगितले.




आटपाडी : युवा महोत्सवातील विजेत्यांच्या गौरवाप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अमरसिंह देशमुख व मान्यवर.

### मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धांचा निकाल

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा व विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी पटकाविला. लोकनृत्य फिरता चषक आजरा महाविद्यालयने पटकाविला.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त गौरव चषकात लोकनृत्यात आजरा महाविद्यालय आजरा, तर शास्त्रीय नृत्यात विवेकानंद कॉलेज कोल्हापुर यांनी फिरता चषक पटकाविला. कोल्हापुरच्या विवेकानंद कॉलेजने नाट्य विभागातील सर्वच चषकावर नाव कोरले. संगित विभागातही विवेकानंद कॉलेजने वर्चस्व कायम ठेवले. दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी यांनी स्थळ चित्रण, व्यंगचित्रण, कातरकाम, भितीचित्र, स्थळ छायाचित्रण, मातीकाम, रांगोळी, सांघीक रचनाकृती, मेहंदी रचना विभागात वर्चस्व कायम ठेवले.

### कोल्हापूरचे विविध प्रकारात यश

शास्त्रीय नृत्य–प्रथम–देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तृतीय – डी. डी. शिंदे सरकार कॉलेज नकला – व्दितीय – राजाराम कॉलेज एकपात्री अभिनय – तृतीय – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स उत्तेजनार्थ – राजाराम कॉलेज व केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सुगम गायन – अनुक्रमे शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज पाश्चिमात्य एकल गायन – अनुक्रमे देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग शास्त्रीय सुरवाद्य – व्दितीय – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तृतीय – विवेकानंद कॉलेज पाश्चिमात्य एकल वादन व्दितीय – विवेकानंद कॉलेज स्थळचित्रण – प्रथम – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, व्दितीय – शिवराज कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज.

व्यंगचित्र – अुनक्रमे – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेज उत्तेजनार्थ – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

> **विवेकानंद कॉलेजला दुहेरी चॅम्पियनशीप**
>
> विवेकानंद कॉलेजने शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरू स्व. डॉ.आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप व अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिपावर नाव कोरले.

भित्तीचित्र – उत्तेजनार्थ – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी.

कातरकाम – प्रथम – शिवराज कॉलेज ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, तृतीय – न्यू कॉलेज.

स्थळ छायाचित्रण – प्रथम – विवेकानंद कॉलेज, तृतीय–आजरा महाविद्यालय, उत्तेजनार्थ – शिवाजी विद्यापीठ.

मातीकाम – प्रथम – राजाराम कॉलेज, व्दितीय – दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी.

रांगोळी – प्रथम – यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, व्दितीय – कला प्रबोधनीचे इन्स्टीट्युट ऑफ डिझाईन, तृतीय – शिवराज कॉलेज ऑफ आर्टस गडहिंग्लज.

मेहंदी– तृतीय – डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग.

वक्तृत्व – मराठी – प्रथम – भोगावती महाविद्यालय, हिंदीत – व्दितीय – न्यु कॉलेज इंग्रजी – प्रथम – विवेकानंद कॉलेज, तृतीय – शिवाजी विद्यापीठ.

20/10/2022 20.10.2022

तरुण भारत सोमवार, २८ मार्च २०२२

# पथनाट्य स्पर्धेत विवेकानंद कॉलेज प्रथम

## लघुनाटीका स्पर्धेत परिस स्पर्श प्रथम : मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक उत्साहात

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील मनोरंजन मंडळ, श्री दगडूलाल मर्दा फौंडेशन आणि रोटरी क्लब सेंट्रलच्यावतीने राज्यस्तरीय युवास्पंदन स्पर्धा उपक्रमाच्या पहिल्या दिवशी आविष्कार – पथनाट्य स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी मिळविले तर लघुनाटिका स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक परिसस्पर्श कराड या संघाने मिळविले.



इचलकरंजी : स्पर्धेतील विजेत्यांना प्रा. दांडेकर, सर्व परीक्षक, प्रा. डॉ. प्रशांत कांबळे, दत्ता टोणपे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

पथनाट्य स्पर्धेत सहभाग घेतलेल्या संघांनी जंगल वाचवा, राष्ट्रीय एकात्मता, जातीयता व विषमता, मासिक पाळी, इत्यादी विषयांवर प्रबोधनपर पथनाट्ये सादर केली. स्पर्धेत अश्वघोष फाउंडेशन कोल्हापूर यांनी द्वितीय क्रमांक मिळवला तर नाटक वर्ल्ड कोल्हापूर यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

लघुनाटिका स्पर्धेतील संघानी पर्यावरण रक्षण, सद्यस्थिती, जातीय व धार्मिक भेदभाव, देशभक्ती, कुटुंब व्यवस्था इत्यादी विषय प्रबोधन, उपहास, विडंबन अशा वेगवेगळ्या शैलीत मांडले. स्पर्धेतील द्वितीय क्रमांक एसीएस कॉलेज मिरज यांनी तर तृतीय क्रमांक नाट्य वर्ल्ड कोल्हापूर यांनी मिळविला. आम्ही रंगकर्मी मुंबई आणि गडहिंग्लज कला अकादमी या संघांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात आले. दोन्ही स्पर्धांसाठी परीक्षक म्हणून डॉ. राजश्री खटावकर कोल्हापूर, प्रशांत गोखले मिरज आणि शुभम चौगुले जयसिंगपूर यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. मिलिंद दांडेकर आणि सर्व परीक्षक यांच्या हस्ते नटराज प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. यतिराज भंडारी यांनी स्वागत केले. स्पर्धा समन्वयक डॉ. प्रशांत कांबळे यांनी प्रास्ताविक केले. स्पर्धा समारोपप्रसंगी प्रा. दांडेकर, सर्व परीक्षक, प्रा. डॉ. प्रशांत कांबळे, दत्ता टोणपे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. संतोष आबाळे यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन त्रिंबक दातार, रोहित कुरणे, मानसी कुलकर्णी, सारंग भांबुरे व निखिल शिंदे यांनी केले. स्पर्धा येथील श्रीमंत घोरपडे नाट्यगृह आणि परिसरात झाल्या. स्पर्धेत इचलकरंजी, कोल्हापूर, सांगली, कराड, सातारा, मुंबई या भागातील स्पर्धकांनी सहभाग घेतला.

तरुण भारत
गुरुवार, १३ ऑक्टोबर २०२२

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व

## महोत्सवात गडहिंग्लजकरांचा चांगला प्रतिसाद : १६ ते १८ ऑक्टोबरला आटपाटीत मध्यवर्ती युवा महोत्सव

प्रतिनिधी
गडहिंग्लज

डॉ. घाळी कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व दिसून आले. आता शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाटी (जि. सांगली) येथील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात १६ ते १८ ऑक्टोबर अखेर पार पडणार आहे. पहिल्यांदाच झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात गडहिंग्लजकरांचा चांगला प्रतिसाद दिला आहे. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे,

**युवा महोत्सवातील अनुक्रमे विजेते असे**

**लोककला** – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लोकनृत्य**– आजरा महाविद्यालय आजरा, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी.

**मूकनाट्य**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, भारती विद्यापीठ, कोल्हापूर, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर.

**नकला**– राजाराम कॉलेज, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर.

**मराठी वक्तृत्व**– भोगावती महाविद्यालय, कुरूकली, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर.

**इंग्रजी वक्तृत्व**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, केआयटी कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**वादविवाद**– डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर, केआयटी कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**सुगमगायन**– न्यू कॉलेज, कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**लघुनाटिका**– शिवशाहू महाविद्यालय, सरूड, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर, भारती विद्यापीठ, कोल्हापूर.

**एकांकिका**– शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**समूहगीत**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर.

**पथनाट्य**– आनंदी कॉलेज, कळबे तर्फे कळे, दूधसागर महाविद्यालय, बिद्री, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**प्रश्नमंजूषा**– तात्यासाहेब कोरे इंजिनिअरींग कॉलेज, वारणानगर, डॉ. डी. वाय. पाटील, कोल्हापूर, महावीर कॉलेज, कोल्हापूर